पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ५६ दिनांक ०८/१०/२०२२

# घरफोडीच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींची उकल करण्यात डहाणु पोलीसांना यश.

दि.०३/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे मिलींद अरविंद करंदिकर रा. रामचंद्र निवास ब्राम्हणआळी डहाणु किल्ला, ता. डहाणु जि. पालघर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन, त्यांचे घराचे पहिल्या माळ्यावरील बेडरुमचे बाथरुमच्या काचा काढून त्यावाटे अज्ञात आरोपीत याने आतमध्ये प्रवेश करुन बेडरुममध्ये असलेल्या लोखंडी कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले ८,१२,०००/- रुपये किमतीचे सोन्या-चांदिचे दागीने फिर्यादी यांचे संमतीशिवाय घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेबाबत डहाणु पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ११५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाग, श्री. शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाग यांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोनि/नामदेव बंडगर, प्रभारी अधिकारी डहाणु पोलीस ठाणे यांना वेगवेगळी तपास पथके तयार करुन सदर गुन्ह्याच्या तपासाबाबत सुचना दिल्या. त्या अनुषंगाने वेगवेगळी तपास पथके तयार करुन सदर गुन्ह्यात कोणताही पुरावा सोडला नसताना अथवा धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तांत्रीक तपास करुन दोन संशयीत आरोपींना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले.

नमुद गुन्ह्यात आरोपीत यांना अटक केली असून त्यांचेकडून चोरुन नेलेल्या एकूण मुद्देमालापैकी ६,४८,३१५/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास हा पोउपनि/भरतेश हारुगिरे, नेमणुक डहाणु पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाग, श्री. शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/नामदेव बंडगर, प्रभारी अधिकारी डहाणु पोलीस ठाणे, सपोनि/व्हि. एस. नार्वेकर, पोउपनि/भरतेश हारुगिरे, सफौ/सुनिल नलावडे, पोहवा/आर. ए. रासम, पोहवा/६२३ जे. जे. खांडवी, मपोना/एस. एन. कहार, पोशि/एस. बी. कदम सर्व नेमणुक डहाणु पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


सौजन्य

